सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग
दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि.५/४/२०१६
३७६४

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सातारा.

विषय :-**ग्राम उदय से भारत उदय अभियान (दि.14 एप्रिल,2016 ते दि.24 एप्रिल, 2016) अंतर्गत विविध उपक्रम हाती घेणेबाबत...**

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक 4/4/2016.

केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने, दिनांक 14 एप्रिल, 2016 (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक 24 एप्रिल,2016 (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार, सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्राम उदय से भारत उदय अभियान तीन टप्प्यात राबविण्याचे आहे.

१) सामाजिक एकताः दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.
२) ग्राम किसान सभा : दिनांक १७ त २० एप्रिल, २०१६.
३) राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभाः दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.

तसेच दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी मा.पंतप्रधान महोदय सर्व ग्रामसभांना उद्देशून भाषण करणार आहेत.

केंद शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तिसऱ्या टप्प्यामध्ये दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करावयाच्या असून, पूर्वतयारी म्हणून प्रभात फेरी, स्वच्छता मोहिम, सांस्कृतिक उपक्रम, क्रिडा स्पर्धा व ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान असे उपक्रम राबविण्याचे निर्देश आहेत. याबाबतच्या सविस्तर सूचना संदर्भीय पत्राने गट विकास अधिकारी यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत –

१) सातारा जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत प्रभात फेरीचे आयोजन करणेबाबतच्या सूचना आपलेस्तरावरुन तालुका व ग्राम पातळीवरील आपले यंत्रणेला निर्गमित कराव्यात.
२) प्रभात फेरी दोन भागांमध्ये आयोजित करण्यात यावी. एका भागात मुले-मुली प्रभात फेरीत सहभागी होतील. यात मुली-मुलींना प्रभावित करणारे मुद्दे उदा.स्वच्छता, शिक्षण व अन्य स्थानिक मुद्यांबाबतचे संदेश देणारे प्लेक्स घेवून सहभागी होतील. प्रभात फेरीत प्लेक्सवर प्रदर्शित करावयाचे संदेशासाठी स्पर्धा आयोजित करुन मुलींनी तयार केलेले तक्ते, पोस्टर्स प्रभात फेरीच्यावेळी घोषणांसोबत प्रदर्शित केले जाऊ शकतील.
३) दुसऱ्या भागात प्रौढ नागरिक सहभागी होतील. यात सहभागी होणारे नागरिक आर्थिक विकास व सामाजिक न्याय या संदर्भातील संदेश लोकांपर्यंत पोहचण्यासाठी प्लेक्स, घोषणा, स्लोगन अथवा इतर संवाद साधनांचा वापर करतील. प्रौढ नागरिकांच्या प्रभात फेरीमध्ये प्रामुख्याने ग्रामपंचायत विकास आराखडा प्रक्रियेवर भर दिला जाईल. तसेच गावातील सामाजिक व आर्थिक मुद्यांवर भर देण्यात येईल. या प्रभात फेरीत ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, महिला बचत गटातील सर्व सदस्य, प्रतिष्ठीत ज्येष्ठ व्यक्ती, युवक मंडळातील सर्व सदस्य, विविध योजनांतील साधन व्यक्ती (Resource Persons), ग्रामस्तरावरील शासकयि व निमशासकिय कर्मचारी यांना समाविष्ट करुन घेणे अत्यंत महत्वपूर्ण आहे. याबाबत ग्रामपंचायत स्तरावर मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांनी ग्रामसेवक, सरपंच, ग्रामपंचायत यांचेशी संपर्क साधन नियोजन करणेचे आहे.
४) **सांस्कृतिक उपक्रम** :- दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर सांस्कृतिक उपक्रम राबवावेत. यात पथनाट्ये, पारंपारिक सांस्कृतिक प्रकार, लोकगीते, लोकनृत्य इ.चा समावेश करावयाचा आहे. ग्रामपंचायतीमधील महसुली गांवे, वाडया-वस्त्यांमधील महिलांसहित जास्तीत जास्त लोकांचा यात सहभाग

मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे. सांस्कृतिक उपक्रमात जास्तीत जास्त लोकसहभाग मिळण्यासाठी महिला बचत गट, युवक मंडळे आणि शाळा यांना उद्युक्त करावे. विकासाबाबत व सामाजिक विषयांबाबत विद्यार्थ्यांचे स्टेज प्ले करण्यासाठी नियोजन करावे. याबाबत मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांना ग्रामपंचायतीशी समन्वय साधून कार्यवाही करणेबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात.

५) **क्रिडा स्पर्धा** :-दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. जास्तीत जास्त लोक क्रिडा स्पर्धेमध्ये सहभागी होतील याद्दष्टी स्पर्धा आयोजित कराव्यात. शाळा, माध्यमिक , उच्च माध्यमिक विद्यालये तसेच महाविद्यालयातील विद्याथी, युवक मंडळांचे सदस्य याबरोबरच स्वयंसेवकांची मदत क्रिडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी घेण्यात यावी. ग्रामपंचायतीशी समन्वय साधून क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणेबाबत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांना आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात. तसेच क्रिडा स्पर्धांमधील विजेत्यांना ग्रामसभेमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्याबाबत ग्रामपंचायतीशी समन्वय साधावा

६) **ग्रामसभांना उपस्थिती** :- अभियाना कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर आयोजित केलेल्या ग्रामसभांना मुख्याध्यापक, शिक्षकांनी उपस्थित राहणेबाबतच्या सूचना देणेत याव्यात.

७) अभियानांतर्गत वरील उपक्रमांच्या नियोजनासाठी तालुकास्तरावर विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक यांची संयुक्त बैठक आयोजित करणेबाबत गट शिक्षणाधिकारी यांना सूचना द्याव्यात.

अभियानांतर्गत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि निवडक कार्यक्रमांच्या छायाचित्रांसह माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा.

प्रत – गट विकास अधिकारी, पंचायत समिती .......(सर्व)